सहायक महसूल अधिकारी संवर्गातून नायब तहसिलदार संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियमित पदोन्नती देणेबाबत- (दिव्यांग प्रवर्ग) (नागपूर विभाग)..

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन आदेश क्रमांकः R&FD-१५०७१/१९/२०२६-MRF(DESKE९)**
(E-१५७६५९५)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-०७.१०.२०२६

**वाचा :-**

१. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.मशा ६ (३) / आस्था-१ / सीआर-४७ / २०२५, दि.१०.०२.२०२६ व दि.१८.०२.२०२६
२. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.मशा ६ (३) / आस्था-१ / सीआर-२५ / २०२६, दि.१८.०६.२०२६

**शासन आदेश:-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि.२९.०७.२०२४ अन्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांना दि.३०.०६.२०१६ पासून पुर्वलक्षी प्रभावाने पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू केलेले आहे. विभागीय पदोन्नती समितीने दिव्यांग प्रवर्गातील श्री.राजेश वैकुंठराव वेदी यांना सन २०२४-२५ निवडसूची वर्षातून दिव्यांग पदोन्नती कोट्यातून नायब तहसीलदार या संवर्गात काल्पनिक पदोन्नती देण्याबाबत केलेल्या शिफारशीस अनुसरून नियमित पदोन्नतीने काल्पनिक मानीव दिनांक मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | दिव्यांग प्रकार | कर्मचाऱ्याचे नांव | दिव्यांग ज्ये.क्र. | पदोन्नतीचा मानीव दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **निवडसूची वर्ष सन २०२४-२५** | | | | |
| १ | क | श्री.राजेश वैकुंठराव वेदी | १४ | ०९.११.२०२५ |

उक्त पदोन्नत अधिका-याच्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

२. उपरोक्त कर्मचाऱ्यांना उक्त तक्त्यात नमूद निवडसूची वर्षनिहाय पदोन्नतीच्या कोट्यातील उपलब्ध नियमित पदावर खालील अटींच्या अधीन राहून नियमित पदोन्नतीने काल्पनिक मानीव दिनांक मंजूर करण्यात येत आहे:-

१. निवडसूची तयार करताना कोणताही ज्येष्ठ कर्मचारी पदोन्नतीसाठी अनवधानाने वगळण्यात आलेले नाहीत अथवा अधिक्रमित झालेले नाहीत.
२. मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सा.प्र.वि. /१६ ब कार्यासनाच्या दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या

सूचनांनुसार सदर पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच, दिनांक ७ मे, २०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

३. सदर नियमित पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने उक्त अधिकाऱ्यांना नियमितपणाचा कोणताही हक्क असणार नाही.

४. तसेच भविष्यात न्यायालयीन अथवा पदोन्नतीच्या अनुषंगाने इतर काही आक्षेप निघाल्यास याची संपुर्ण जबाबदारी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग या कार्यालयाची राहील.

३. उपरोक्त अधिकाऱ्यांना काल्पनिक पदोन्नतीचा मानीव दिनांक मंजूर करण्यात येत असल्याने त्यांची नायब तहसिलदार संवर्गातील ज्येष्ठता उक्त मानीव दिनांकानुसार निश्चित करण्यात यावी. तसेच, उक्त तक्त्यात नमूद वर्षनिहाय निवडसूची व नायब तहसीलदार संवर्गाची ज्येष्ठता यादी अद्ययावत करण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या कार्यालयाने करावी.

४. सदर आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१००७१९०९१४४१४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

MAHESH ASHOKRAO
VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.10.07 19:10:03 +05'30'

**(महेश वरूडकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क/क्रीडा व युवक कल्याण/ अल्पसंख्याक विकास आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६) संबंधित जिल्हाधिकारी.
७) प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
८) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
९) संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
१०) संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
११) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) संबंधित नायब तहसीलदार (संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत).

१३) उप सचिव (आस्था-९) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.

१४) सह सचिव (कार्यासन-१२/सेवा-२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई

१५) निवड नस्ती (कार्यासन आस्था-९), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.